आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

३१ जानेवारी २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- उत्तर प्रदेशातल्या एटा जिल्ह्यातलं ‘पाटणा पक्षी अभयारण्य’ आणि गुजरातमधल्या कच्छ जिल्ह्यातलं ‘छारी-धांड’ यांना रामसर स्थळांचा दर्जा

- भारत-युरोप महासंघातल्या मुक्त व्यापार करारामुळे युरोपियन देशांना होणारी भारताची निर्यात पाच वर्षांत दुप्पट होऊ शकते, असा केंद्रीय वाणिज्य मंत्र्यांना विश्वास

- देशाच्या साखर उत्पादनात १८ पूर्णांक ३५ शतांश टक्के वाढ

आणि

- महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाची बैठक आज मुंबईत

<><><><><>

देशामध्ये आणखी दोन नव्या पाणथळ जागांना ‘रामसर ’स्थळांचा दर्जा मिळाल्याची घोषणा पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी केली आहे. उत्तर प्रदेशातल्या एटा जिल्ह्यातलं ‘पाटणा पक्षी अभयारण्य’ आणि गुजरातच्या कच्छ जिल्ह्यात ‘छारी-धांड’ ही ठिकाणं रामसर क्षेत्रात समाविष्ट झाली आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाचं रामसर क्षेत्र २७६ टक्क्यांहून अधिक विस्तारलं आहे. २०१४ मध्ये अशा पाणथळ जागा केवळ २६ होत्या, त्यात वाढ झाली असून आता ही संख्या ९८ पर्यंत पोहोचल्याचं यादव यांनी म्हटलं आहे. १९७१ मध्ये इराणमधल्या रामसर इथं झालेल्या पाणथळ जागांच्या करारात १ फेब्रुवारी, १९८२ पासून भारत सहभागी देश आहे.

<><><><><>

उत्तर प्रदेशातल्या एटा जिल्ह्यातलं ‘पाटणा पक्षी अभयारण्य’ आणि गुजरातमधल्या कच्छ जिल्ह्यातल्या ‘छारी-धांड’ चा ‘रामसर स्थळांच्या यादीत’ समावेश झाल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला आहे. जिल्ह्यात स्थानिक रहिवाशांचं तसंच पाणथळ जागांच्या संवर्धनाबद्दल कार्यरत असलेल्या नागरिकांचं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावर अभिनंदन केलं आहे. पाणथळ जागा असंख्य स्थलांतरित आणि स्थानिक

प्रजातींसाठी सुरक्षित अधिवास असतो, त्यामुळे अशा पाणथळ जागांची मोठ्या प्रमाणात वाढ व्हावी, अशी इच्छा मोदी यांनी व्यक्त केली आहे.

<><><><><>

भारत-युरोप महासंघातल्या मुक्त व्यापार करारामुळे युरोपियन देशांना होणारी भारताची निर्यात पाच वर्षांत दुप्पट होऊ शकते, असा विश्वास वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी आपल्या समाज माध्यमांवर व्यक्त केला आहे. उद्योजक, सुक्ष्म, लघू, मध्यम उद्योजक, स्टार्टअप यांनी आंतरराष्ट्रीय स्तारावर लक्ष केंद्रित करण्याचं आवाहनही त्यांनी केलं. तसंच हा व्यापार करार हा देशाला वेगवेगळ्या प्रकारे कसा फायदा देईल यावर मंत्र्यांनी प्रकाश टाकला. हा मुक्त व्यापार करार एक शक्तिशाली मुक्त व्यापार करार आहे, जो देशाच्या संवेदनशील क्षेत्रांचं रक्षण करताना भारतासाठी मोठ्या संधी विकसित करेल, असंही ते म्हणाले.

<><><><><>

भारत आणि अरब देशांच्या परराष्ट्रव्यवहारमंत्र्यांची दुसरी बैठक आज नवी दिल्लीत होणार आहे. भारत आणि संयुक्त अरब अमिराती बैठकीचं अध्यक्षपद भूषवतील. भारतात प्रथमच ही बैठक होत आहे. अरब देशांच्या संघटनेतले २२ देश बैठकीत सहभागी होत असून या देशांचे परराष्ट्रमंत्री आणि अरब लीगचे महासचिव त्याला उपस्थित राहतील. अरब देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची ही बैठक १० वर्षानी होत असून यापूर्वी २०१६ मध्ये ही बैठक झाली होती, त्यामध्ये अर्थव्यवस्था, ऊर्जा, शिक्षण, प्रसारमाध्यम आणि संस्कृती या पाच क्षेत्रात सहकार्य वाढवण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आल होतं. दीर्घ काळानंतर होणाऱ्या या बैठकीमुळे भारत आणि अरब देशांदरम्यान परस्पर संबंध आणि सहकार्य अधिक मजबूत होण्याची अपेक्षा आहे.

<><><><><>

भारतीय पोलीस सेवेतल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना केंद्र सरकारची दोन वर्ष सेवा अनिवार्य करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक आणि उपमहानिरीक्षक पदासाठी अर्हताप्राप्त अधिकाऱ्यांना हा नियम लागू होईल, असं केंद्रीय गृहमंत्रालयानं यासंदर्भात सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना लिहीलेल्या पत्रात म्हटलं आहे. २०११ च्या तुकडीपासून हा नियम लागू होईल.

<><><><><>

देशभरात २५ कोटींहून अधिक मृदा आरोग्य कार्डांचं वाटप शेतकऱ्यांना करण्यात आलं आहे. कृषी मंत्रालयानं आज ही माहिती दिली. अनेक कारणांमुळे मातीतल्या पोषक तत्वांच्या पातळीत घट होत आहे. त्यावर उपाययोजना म्हणून सरकारने २०१५ मध्ये मृदा आरोग्य कार्ड योजना सुरू केली. गेल्या वर्षी जुलैपर्यंत, या योजनेअंतर्गत ९३ हजारांहून अधिक शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम, ६ लाखांहून अधिक थेट प्रात्यक्षिकं आणि हजारो जनजागृती मोहिमा राबवण्यात आल्या. मृदा  आरोग्य कार्ड दर दोन वर्षांनी जारी केली जातात. त्याद्वारे शेतकऱ्यांना त्यांच्या मातीतली पोषक तत्वांची स्थिती आणि भौतिक-रासायनिक परिस्थितीची व्यापक माहिती दिली जाते.

<><><><><>

पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेश अर्थात नीट पीजी प्रवेश प्रक्रियेची तिसरी फेरी सुरू झाल्याची माहिती आरोग्य सेवा महासंचालनालयानं समाजमाध्यमाद्वारे दिली आहे. पुन्हा सुरू झालेल्या या समुपदेशन प्रक्रियेत नवी नोंदणी सुविधा उपलब्ध असणार आहे. अतिरिक्त जागांचाही समावेश करण्यात आला असल्यानं विद्यार्थ्यांना अधिक संधी असल्याचंही या पोस्टमध्ये म्हटलं आहे. विद्यार्थ्यांनी या प्रक्रियेत सहभागी होऊन त्यांचे पसंतीक्रम द्यावेत असं आवाहन महासंचालनालयानं केलं आहे. अधिक माहिती वैद्यकीय समुपदेशन समितीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

<><><><><>

२०२५-२६च्या हंगामात जानेवारी अखेरपर्यंत देशाचं साखर उत्पादन १८ पूर्णांक ३५ शतांश टक्क्यांनी वाढून साडे एकोणीस दशलक्ष टनांवर गेल्याची माहिती भारतीय साखर कारखाना संघटनेनं दिली आहे. गेल्या हंगामात हे प्रमाण साडे १६ दशलक्ष टन इतकं होतं.  सर्वाधिक उत्पादन महाराष्ट्रात झालं आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसनं आज मुंबईत विधिमंडळ पक्षाची बैठक बोलावली आहे. त्यात विधिमंडळ पक्षनेत्याची निवड होईल, अशी माहिती पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी दिली.

विधिमंडळ नेतेपदासाठी दिवंगत अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्या नावाची चर्चा आहे.

दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही पक्षांचं विलीनीकरण करण्याच्या पर्यायाची चर्चाही सुरु आहे.

<><><><><>

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान ट्वेंटी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला पाचवा आणि अंतिम सामना आज तिरुवनंतपुरम इथं होणार आहे. सायंकाळी ७ वाजता सामना सुरु होणार आहे. भारताने यापूर्वीच या मालिकेत विजयी आघाडी घेतली आहे.

यानंतर ७ फेब्रुवारीपासून ट्वेंटी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेला सुरुवात होणार आहे.

<><><><><>

वडोदरा इथं उद्या खेळल्या जाणाऱ्या महिला प्रीमियर लीग क्रिकेट सामन्यांच्या शेवटच्या साखळी सामन्यात दिल्ली कॅपिटल्सचं भवितव्य ठरणार आहे. युपी वॉरियर्स विरुद्ध हा सामना होणार असून दिल्ली कपिटल्सचा संघ जिंकला तर त्यांना थेट गुजरात जायंट्स विरुद्ध एलिमिनेटरमध्ये पाठवलं जाईल. ज्यामध्ये आठ गुण असतील आणि ते लीगमध्ये तिसऱ्या स्थानावर राहतील तसंच गतविजेत्या मुंबई इंडियन्सला धावांच्या यादीतून बाहेर काढतील. दुसरीकडे, शेवटच्या स्थानावर असलेल्या युपी वॉरियर्स विजयी झाले तर मुंबईसाठी दारं खुली होतील. अशा परिस्थितीत या तिन्ही संघांचे समान सहा गुण असतील आणि नेट रन रेट अंतिम फेरीत स्थान मिळविण्यासाठी एलिमिनेटरमध्ये गुजरात जायन्टसचा सामना कोणाशी होईल हे ठरेल. तिन्ही संघांपैकी वॉरियर्सचा सर्वात वाईट नेट रन रेट असून मुंबई इंडियन्सचा सर्वोत्तम नेट रन रेट आहे.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं आठ सामन्यांतून सहा विजयांसह पाच संघांच्या क्रमवारीत अव्वलस्थान पटकावलं आहे. डीसीच्या वरच्या फळीच्या फलंदाजांनी जास्त धावा केल्या नसून उद्याच्या या महत्वाच्या सामन्यात भारतीय सलामीवीरांकडून मोठं योगदान मिळण्याची अपेक्षा आहे. उद्या संध्याकाळी साडेसात वाजता सामना सुरु होईल.

<><><><><>

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सामाजिक विकास आयोगाच्या ६४ व्या अधिवेशनात केंद्रीय महिला आणि बालविकास राज्यमंत्री सावित्री ठाकूर भारतीय शिष्टमंडळाचं नेतृत्व करणार

आहेत. हे अधिवेशन संयुक्त राष्ट्रांच्या न्यूयॉर्क इथल्या मुख्यालयात २ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. सामाजिक समावेशन, समता आणि कल्याणकारी धोरणांसह अन्य सामाजिक विकासाच्या मुद्द्यावर आंतरराष्ट्रीय सहकार्याला गती देणं हे या सत्राचं प्रमुख उद्दिष्ट आहे.

या अधिवेशनातला भारताचा सहभाग सामाजिक विकासासाठी होणाऱ्या बहुपक्षीय प्रयत्नातली देशाची सातत्यपूर्ण भूमिका दर्शवतो. तसंच जागतिक सामाजिक धोरणांवरील प्राधान्याच्या विषयांवरचा सकारात्मक संवाद साधण्याची भारताची बांधिलकीही यातून स्पष्ट होते, असं महिला आणि बालविकास मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशाच्या उत्तर भागात पश्चिमी वारे आणि हिमालयीन प्रदेशातली हिमवृष्टी यामुळे अजूनही थंडीचा जोर आहे. जम्मू काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमधे जोरदार हिमवृष्टी होत आहे. बर्फ साचल्याने रस्ते बंद झाले आहेत. जनजीवन विस्कळीत झालं आहे.

मध्य प्रदेशात दाट धुकं आहे. उत्तर भागात वादळी पावसाची शक्यता आहे.

महाराष्ट्रात हवामान ढगाळ आहे.

राजस्थानात तापमानात किंचित वाढ झाली असून थंडीचा जोर ओसरला आहे. अनेक ठिकाणी आकाश ढगाळ असून पाऊस आणि गारपिटीची शक्यता आहे.

**//<><><><><>//**